# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
## विद्यार्थी विकास विभाग

दूरध्वनी : २६६०९४७ Website:www.sgbau.ac.in/Student Development/Letter Email:directorsd@sgbau.ac.in


क्र.संगाबाअवि/१३/६०/२०२०
दिनांक : ०२.०५.२०२०

प्रति,
**मा.प्राचार्य/विभाग प्रमुख,**
सर्व संलग्नित महाविद्यालये व पदव्युत्तर शैक्षणिक विभाग,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.

**विषय : कोरोना विषाणू (कोवीड-१९) प्रादुर्भावामुळे सद्यःस्थितीत अस्तित्वात असलेल्या देशव्यापी बंद दरम्यान (लॉकडाऊनमुळे) शिक्षणासाठी विद्यापीठाच्या परिक्षेत्रांमध्ये असलेल्या महाविद्यालय परिसर/शहर/गांव इत्यादी ठिकाणी अडकलेल्या विद्यार्थ्यांसाठी सुरु करण्यात आलेल्या HELP LINE बाबत.**

**महोदय/महोदया,**

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, सद्यःस्थितीत कोरोना विषाणू COVID-19 प्रादुर्भावामुळे संपूर्ण देशात देशव्यापी बंद (लॉकडाऊन) १७ मे, २०२० पर्यंत राहणार आहे, ही परिस्थिती लक्षात घेता, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातंर्गत येणाऱ्या महाविद्यालयातील शिक्षण घेत असलेले अनेक विद्यार्थी विद्यापीठाच्या परिक्षेत्रांमध्ये असलेल्या महाविद्यालय परिसर/शहर/गांव इत्यादी ठिकाणी थांबले आहेत किंवा काही विद्यार्थी शहरातच अडकले आहेत व निरनिराळ्या कारणाने त्यांच्या समोर अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत.

या समस्या सोडविण्याकरिता व्यवस्थापन परिषदेने दिनांक २५.०४.२०२० रोजी संपन्न झालेल्या सभेमध्ये घेतलेल्या निर्णयानुसार विद्यापीठाद्वारे विद्यापीठाच्या संकेत स्थळावर **Corona Impact : Important Notices & Circulars** यामध्ये गरजू विद्यार्थ्यांसाठी HELP LINE सुरु करण्यात आलेली आहे. या HELP LINE द्वारे गरजू विद्यार्थ्यांचे online च्या माध्यमातून अर्ज मागवून त्यांना सोबत जोडलेल्या विनियमाचे अधिन राहून जिवनावश्यक अन्नधान्य, किराणा वस्तुंचा संच किंवा तयार करण्यात आलेले जेवण डब्यांद्वारे (Food Packet) वाटपाची सेवा व इतर मदत सुरु करण्यात येणार आहे.

आपणांस विनंती करण्यात येते की, सद्यःस्थितीत कोरोना विषाणू COVID-19 प्रादुर्भावामुळे संपूर्ण देशात देशव्यापी बंद (लॉकडाऊन) दरम्यान आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थी महाविद्यालय परिसर/शहर/गांव इत्यादी ठिकाणी अडकले असल्यास सदर माहिती त्यांचेपर्यंत पोहचविण्यात येवून त्यांना अवगत करुन देण्यात यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,

**(डॉ. दिनेशकुमार सातंगे)**
संचालक,
विद्यार्थी विकास
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

सहपत्र : **कोरोना विषाणू प्रादुर्भाव विद्यार्थी सहाय्य विनियमावली**

**प्रतिलिपी :**
१) मा.कुलगुरू, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.
२) प्र.कुलगुरू, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.
३) कुलसचिव, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.
४) रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी (अमरावती शहर), संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.
५) विद्यार्थी विकास अधिकारी (अमरावती शहर), संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.
६) जनसंपर्क अधिकारी, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.

यांना विनंती करण्यात येते की, सदर माहिती बातमी या सदराखाली स्थानिक व प्रादेशिक वृत्तपत्रांमध्ये यथाशिघ्र प्रसिध्द करण्यात यावी.

# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
## विद्यार्थी विकास विभाग

**कोरोना विषाणू प्रादुर्भाव विद्यार्थी सहाय्य विनियमावली**

१) या योजनेचा लाभ, कोरोना विषाणू COVID-19 प्रादुर्भावामुळे संपूर्ण देशात देशव्यापी बंद (लॉकडाऊन) असल्यामुळे विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या महाविद्यालयांच्या ठिकाणी अडकलेले गरजू विद्यार्थी जे प्रवेशित व नियमित विद्यार्थी असेल असे विद्यार्थी पात्र राहतील.

२) ही योजना अंमलात आल्याचे दिनांकापासून ते लॉकडाउन असण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत सुरु राहिल.

३) गरजू विद्यार्थी हा विद्यापीठाचे विभाग व विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयात शिक्षण घेत असला पाहिजे किंवा पी.एच.डी. चा नोंदणी झालेला असावा.

४) योजनेचा लाभ घेण्यास आवश्यक पुरावा-विद्यार्थ्याला महाविद्यालयाचे ओळख पत्र, परीक्षा फॉर्म भरल्याचा पुरावा, पी.एच.डी. नोंदणी चा पुरावा, परीक्षा निकालाची प्रत/गुणपत्रिका, महाविद्यालयातील प्राचार्यांचा/विभाग प्रमुखांचा ऑनलाईन दाखला किंवा ग्रंथालयाचे पुस्तक देव घेव (बी.टी.कार्ड) ओळखपत्र यापैकी कोणताही एक पुरावा अनिवार्य राहील.

५) ऑनलाइन अर्ज करतांना स्वतःचे पूर्ण नाव, गावाचे नाव व स्थायी पत्ता, महाविद्यालय परिसर/शहर/गांव अशा अडकलेल्या ठिकाणचा पत्ता, महाविद्यालयाचे नाव किंवा विद्यापीठ विभागाचे नाव पी.एच.डी. नोंदणी केली असल्यास तसा उल्लेख असणे आवश्यक राहील.

६) विद्यार्थ्यांची गरज व तो पात्र आहे की नाही हे ठरविण्याचा अंतिम अधिकार समितीला राहील.

७) कोरोना विषाणू प्रादुर्भाव विद्यार्थी सहाय्य समितीचे नियंत्रण कक्ष संचालक, विद्यार्थी विकास यांच्या कार्यालयात राहील.

**(डॉ. दिनेशकुमार सातंगे)**
संचालक,
विद्यार्थी विकास
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ